RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—ब

वर्ष ३, अंक ८८(२)] सोमवार, जुलै १०, २०१७/आषाढ १९, शके १९३९ [पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक २०७**

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश**

**गृह विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १० जुलै २०१७

**अधिसूचना**

**महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम.**

क्रमांक बीपीए-०११७/सीआर-०२/इएक्ससी-२.—महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम (१९४९ चा २५) कलम १४३ च्या पोट-कलम २ (b) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासनाने करण्याचे योजिलेल्या नियमांचा पुढील मसुदा हा त्यामुळे बाधा पोचण्याची शक्यता असलेल्या सर्व व्यक्तींच्या माहितीकरिता, उक्त अधिनियमाच्या कलम १४३ पोट-कलम (३) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे आणि याद्वारे अशी नोटीस देण्यात येत आहे की, उक्त मसुदा, महाराष्ट्र शासनाकडून दिनांक २५ जुलै २०१७ रोजी किंवा त्यानंतर विचारात घेण्यात येईल.

२. उपरोक्त दिनांकापूर्वी, उक्त मसुद्याच्या संबंधात, कोणत्याही व्यक्तीकडून ज्या कोणत्याही हरकती किंवा सूचना, प्रधान सचिव, गृह विभाग, (राज्य उत्पादन शुल्क) मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ यांच्याकडे प्राप्त होतील त्या शासन विचारात घेईल.

**प्रारूप नियम**

१. या नियमांना महाराष्ट्र मद्यार्क आसवन व पेय मद्य निर्मिती (सुधारणा) नियम, २०१७ असे संबोधण्यात यावे.

२. महाराष्ट्र मद्यार्क आसवन व पेय मद्य निर्मिती नियम, १९६६ च्या नियम १७ च्या उप-नियम २८ मधील " स्वच्छ केलेले व धुतलेले असतील." या शब्दानंतर खालील शब्दांचा अंतर्भाव करण्यात येईल.

" बाटल्या व पात्रांसाठी वापरण्यात आलेला पदार्थ हा केवळ काच असेल व त्यावर " फक्त महाराष्ट्र राज्यात विक्रीकरिता " असे शब्द ठळकरित्या मराठीत किंवा इंग्रजीत उमटविण्यात येतील."

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**पु. हि. वागदे,**
शासनाचे सहसचिव.

## HOME DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya Mumbai 400 032, dated 10th July 2017

*NOTIFICATION*

MAHARASHTRA PROHIBITION ACT.

No.BPA. 0117/C.R.02/EXC-2.—The following draft of rules further to amend the Maharashtra Distillation of Sprit and Manufacture of Potable Liquor Rules, 1966 which the Government of Maharashtra proposes to make in exercise of powers conferred by clause (b) of sub-section (*2*) of section 143 of the Maharashtra Prohibition Act (XXV of 1949); and of all other powers enabling it in this behalf is hereby published, as required by sub-section (*3*) of the section 143 of the said Act, for the information of all persons likely to be affected thereby; and notice is hereby given that the said draft will be taken in to consideration by the Government of Maharashtra on or after 25th July 2017.

2. Any objection or suggestion which may be received by the Principal Secretary, Home Department (State Excise) Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya, Mumbai 400 032, from any person with respect to the said Amendment Draft before the aforesaid date will be considered by the Government.

*DRAFT RULES*

1. These rules may be called the Maharashtra Distillation of Spirit and Manufacture of Potable Liquor (Amendment) Rules, 2017.

2. In rule 17 of the Maharashtra Distillation of Sprit and Manufacture of Potable Liquor Rules, 1966, in sub-rule 28 after the words "cleaned and washed " the following portion shall be added namely :—

" The material used for bottles and containers shall be only glass and it shall be embossed with words ' FOR SALE IN MAHARASHTRA STATE ONLY ' in bold letters either in Marathi or in English."

By order and in the name of the Governor of Maharashtra,

P. H. WAGDE,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.